# Washim District Police

**Nature of Work** :- **Illegal Stock of food grains Seized**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **30/09/2022**

**Brief of the work done :-**

राशनच्या तांदळाचा काळाबाजार करणाऱ्याविरोधात पोलिसांची कारवाई.

## पोलिसांनी आवळल्या तांदूळ तस्कराच्या मुसक्या

### १६ लाखांचा मुद्देमाल जप्त ; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**कारंजा :** जीवनावश्यक वस्तूंचा गैरप्रकार तसेच काळाबाजार रोखण्यासाठी साठेबाजी/काळाबाजारी करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी मोहिम हाती घेतली. त्यानुसार २८ सप्टेंबर रोजी कारंजा ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत राशनच्या तांदळाचा कारबाजार करणाऱ्याविरुध्द कारवाई करत राशनच्या तांदुळासह १६ लाख ५९ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.



कारंजा तालुक्यात जीवनावश्यक वस्तूंसह राशनच्या धान्याची साठेबाजी केल्या जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार वाशीम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कोळी येथील दुकानवर बुधवारी छापा टाकला असता ग्राम कोळी येथील अमीर मदार गुगीवाले याच्या ताब्यात अवैध विनापरवाना शासकीय स्वस्त धान्य दुकानात वितरीत करण्यात येत असलेला तांदळाचा साठा आढळून आला. यावेळी ९५ हजार २२० रुपये किंमतीचे ७० किलो वजनाचे एकूण ७९ कट्टे तसेच चार वाहनांमध्ये भरून ठेवल्याचे आढळून आले. सदर तांदुळाचा साठा व १५ लाख ६४ हजार रुपये किंमतीची चार वाहने पोलिसांनी पंचनामा करुन पंचासमक्ष जप्त केली. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह,पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, एपीआय विजय जाधव, गजानन अवगळे, मुकेश भगत, राम नागुलकर, गजानन गोटे, संगीता शिंदे, किशोर खंदारे, शुभम चौधरी व चालक पोकॉ.घोडे या वाशीम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.